## राज्यात होळी, धुलिवंदनसाठी नियमावली जारी



**मुंबई :** दोन वर्षानंतर निर्बंध शिथिल झाले असल्याने या वेळी होळी तसेच धुलिवंदन सण मोठ्या उत्साहात साजरा केला जाण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने हे सण साजरे करण्यासाठी नियमावली जारी केली आहे. रात्री १० वाजायच्या आत होळी पेटवणे बंधनकारक आहे. होळीदरम्यान डीजे लावण्यावर कायदेशीर बंदी आहे. दहावी तसेच बारावी वर्गाच्या परीक्षा सुरु असल्यामुळे लाऊडस्पीकरचा आवाज मोठा केल्यास कारवाई होईल. होळी साजरी करताना मद्यपान तसेच बिभत्स वर्तन केल्यास कारवाई होईल. होळी खेळताना महिला तसेच मुलींची खबरदारी घेण्याचे आवाहन आदी नियम गृह विभागाने जारी केले आहेत. यासोबतच कोरोना प्रतिबंधक नियमांचेही पालन करावे, असे आवाहनही राज्य सरकारकडून करण्यात आले आहे.

गुरुवार, १७ मार्च २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २३९
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

### अंतरंग

'शेतकऱ्यांच्या निर्णयाबाबत राज्य सरकारची दिरंगाई'/२
जिल्ह्यात मुलांच्या लसीकरण मोहीमेस प्रारंभ/५
आयसीसीकडून नव्या कसोटी क्रमवारीची घोषणा/६

# भूमिपुत्रांचे दास्तान फाटा येथे आज रास्ता रोको आंदोलन

## सिडकोचा वर्धापन दिन काळा दिन म्हणून पाळणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी पनवेल, उरण व बेलापूर पट्ट्यातील ९५ गावातील सिडको पीडित प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र काळा दिन पाळणार आहेत. त्या अनुषंगाने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जन्मगावी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून सकाळी १०. ३० वाजता दास्तान फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

सिडकोचा वर्धापन दिन हा प्रकल्पग्रस्त काळा दिन म्हणून साजरा करणार असा निर्धार करणाऱ्या लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण कृती समिती बरोबरच्या चर्चेत सिडको व्यवस्थापनाने कुठलेही ठोस आश्वासन न दिल्याने ही चर्चा फिस्कटली आहे. कृती समिती कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांनी बैठकीतच आंदोलनाचा निर्धार व्यक्त केला आहे. सिडको गेली चाळीस वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर नेहमी उदासीनता दाखवत आली आहे. नवी मुंबई बसवण्यासाठी स्वतःच्या कसत्या जमिनी कवडीमोल भावाने देऊन शंभर टक्के भूमिहीन झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा असंतोष खदखदत आहे. गेली दोन पिढ्या आंदोलन करणारे सिडकोपीडित शेतकरी आता करो या मरो च्या भावना व्यक्त करू लागले आहेत. यामुळे सिडको प्रति आपला निषेध व्यक्त करण्यासाठी कृती समितीचे नेतृत्वाखाली १७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी काळा दिन पाळून आंदोलन करण्याचे ठरवले आहे. जेथून सिडकोविरोधात आंदोलनास सुरुवात झाली त्या जासई येथील दास्तान फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांना याबाबतचे निवेदन दिल्यानंतर सिडकोच्या वतीने निर्मल भवन मुंबई येथे कृती समिती बरोबर बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत सिडकोने केलेला ठराव विखंडित करून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा ठराव मंजूर करावा, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनाविलंब साडेबारा टक्केचे भूखंड वाटप, गरजेपोटी बांधकामाबाबत झालेल्या शासनाच्या निर्णयातील त्रुटी आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या याविषयी चर्चा झाली, मात्र सिडकोने विमानतळ नामकरणाचा ठराव देण्यास नकार देत बाकी सर्व मागण्यांवर बैठका करू, लवकर सर्व प्रश्न सोडवू असे नेहमीच्या धाटणीची उत्तरे दिली. (पान २ वर..)

# पनवेल मनपाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर भर

## १४९९ कोटींचे अंदाजपत्रक जाहीर

**पनवेल : प्रतिनिधी**

कोणतीही करवाढ नसलेला पनवेल महापालिकेचा सन २०२२-२३चा १४९९.७० कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प बुधवारी (दि. १६) आयुक्त गणेश देशमुख यांनी स्थायी समितीत सादर केला. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षण यासाठी तरतूद करण्यात आली आहे. सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर यांनी सदस्यांच्या मागणीनंतर त्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून आजची सभा तहकूब केली.

स्थायी समितीची मंगळवारची तहकूब सभा बुधवारी मुख्यालयात झाली. या वेळी आयुक्तांनी सभापती अ‍ॅड. ठाकूर यांना सन २०२२-२३चा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात एकूण जमा १४९९.७० कोटी तर एकूण खर्च १४९७.८९ कोटी रुपये दाखवला आहे. एक कोटी ८० लाखाची शिल्लक दाखवण्यात आली आहे. (पान २ वर..)



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

### करासंदर्भातील संधीचा लाभ घ्या -सभागृह नेते परेश ठाकूर


मालमत्ता कर भरला नाही तर विकासकामे करता येणार नाही. यासाठी तो भरणे गरजेचे आहे त्यातच कोरोनामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, व्यवसाय बंद झाले. त्यामुळे एकदम मालमत्ता कर भरणे इच्छा असली तरी अवघड आहे. यासाठी आज आम्ही भाजपच्या नगरसेवकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेऊन त्यांच्याकडे प्रशासनाकडून बिले देण्यास उशीर झाला आहे त्याचा भुर्दंड नागरिकांना नको अशी मागणी केली. या वेळी त्यांनी ३१ मार्च २०२२ पर्यंत १ ऑक्टोबर २०१६ पासून ३१ मार्च २०१९ पर्यंतचा मालमत्ता कर भरल्यास त्यांना दंड माफ करण्यास सहमती दिली. त्यामुळे नागरिकांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी ३१ मार्च २०१९ पर्यंतचा कर ३१ मार्च पूर्वी भरावा, असे आवाहन सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले.

### अशी आहे खर्चाची तरतूद

*बांधकामासाठी ३२६.५४ कोटी यात महापौर निवासस्थान बांधकाम १२ कोटी, माता रमाई आंबेडकर सामाजिक केंद्र पाच कोटी, स्वराज्य मनपा प्रशासकीय इमारत ४० कोटी, प्रभाग कार्यालये १२ कोटी, शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र १० कोटी, गावठाण पायाभूत सोयीसुविधा ६२ कोटी, तलाव सुशोभीकरण १४ कोटी, सिडको भूखंड हस्तांतरण ४० कोटी, शिक्षणासाठी २१ कोटी यात इंग्रजी माध्यमाची एक शाळा सुरू करणे, ई-लर्निंग संगणक प्रशिक्षण सेवा तीन कोटी व साहित्य पुरवणे, दिव्यांग कल्याण ५.२६ कोटी दिव्यांग पुनर्वसन व विकास पाच कोटी, महिला व बालकल्याण विभाग २.५२ कोटी, पर्यावरण १.३० कोटी, अग्निशमन वाहने खरेदी २१ कोटी, घन कचरा (शहर सफाई) ७५ कोटी, पीएमएवाय योजना झोपडपट्टी पुनर्विकास २०५ कोटी.*

आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची

# सेतूबाधित मच्छीमारांसाठी एमएमआरडीएसोबत बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावा-शिवडी सी-लिंक प्रकल्पामुळे बाधित झालेल्या न्हावा गावातील ७८९ मच्छीमारांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मागणीनुसार एमएमआरडीएचे आयुक्त यांच्यासोबत बुधवारी (दि. १६) बांद्रा येथील कार्यालयात बैठक झाली. एमएमआरडीएचे अधिकारी स्वतः या विभागात येऊन कागदपत्रांसंदर्भात असलेल्या त्रुटी दूर करण्याचे आणि हा प्रश्न मार्गी लावण्याचे या बैठकीत एमएमआरडीए आयुक्तांनी आश्वासित केले आहे.

या बैठकीला एमएमआरडीएचे अधिकारी, पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायत सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, उरण उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, सागर ठाकूर, गव्हाण उपसरपंच विजय घरत, युवा नेते अमर म्हात्रे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### दक्षिण कोरियात कोरोनाचा कहर

**सोल :** चीनमध्ये ओमायक्रॉनच्या सब व्हेरिएंटमुळे गेल्या तीन दिवसांत रुग्णसंख्या वाढली असतानाच दक्षिण कोरियात कोविडचा प्रकोप पाहायला मिळत आहे. तेथे बुधवारी चार लाखांहून अधिक कोरोना रुग्ण आढळले आहेत.

### रस्त्यांबाबत ना. गडकरींकडून घोषणा

**नवी दिल्ली :** रस्त्यांसंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी २०२४पर्यंतचा प्लान ऑफ अ‍ॅक्शनच जाहीर केलाय. भारतामधील रस्त्यांचे जाळे आणि संबंधित पायाभूत सुविधा २०२४पर्यंत अमेरिकेच्या बरोबरीचे करण्याचे नियोजन केंद्र सरकारने केलेय, असे गडकरी म्हणाले.

**राम प्रहर**

### शुक्रवारचा अंक नाही

**होळी सणानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास गुरुवारी सुटी असल्यामुळे शुक्रवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.**

होळीच्या सर्वांना शुभेच्छा!

-मुख्य संपादक

# कोकणासह राज्यात उष्णतेची तीव्र लाट

**पुणे : प्रतिनिधी**

वायव्य दिशेकडून येणारे उष्ण वारे निरभ्र आकाशामुळे थेट महाराष्ट्राच्या दिशेने प्रवास करत आहेत. त्यामुळे कोकणासह, महाराष्ट्र तसेच राजस्थान आणि गुजरातमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात तापमानाचा पारा चढाच राहण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने २१ मार्चपर्यंत राज्यभरात अनेक ठिकाणी सौम्य उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.



## कर्जत तालुक्याचा पारा ४२ अंशावर

**कर्जत : बातमीदार**

प्रशासनाने जाहीर केल्याप्रमाणे पुढील तीन दिवस उष्माघाताचा त्रास जाणवणार आणि त्यासाठी सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. कर्जत तालुक्यात बुधवारी (दि. १६) ४२ अंश एवढे तापमान नोंदवले गेले आहे. कालप्रमाणे आजदेखील दुपारपासून रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत होता. दरम्यान, कर्जत तालुक्याचे तापमान ४२ तर माथेरानचे तापमान ३८ एवढे नोंदवले गेले आहे.

१५ मार्च रोजी कर्जत तालुक्यातील पारा चाळीशी पार करून पुढे गेला होता. त्यात शासनाकडून आलेले निर्देश आणि सूचना यामुळे लोकांनी खबरदारी घेत घराबाहेर कामाशिवाय घराबाहेर पडण्याचे टाळले होते. कर्जत तालुक्यातील दोन ठिकाणी तापमान मोजण्याची यंत्रणा आहे तेथे दररोजचे तापमान मोजून त्याची माहिती जिल्हा प्रशासनाला कळविली जाते. कर्जत तालुक्यात कर्जत नगरपालिका हद्दीत दापोली कृषी संधोधन केंद्राच्या भात संशोधन केंद्रात दैनंदिन तापमान मोजणारे यंत्र बसविले आहे. त्याचवेळी माथेरान या पर्यटनस्थळी गिरीस्थान नगरपालिका कडून देखील दैनंदिन तापमान मोजले जाते आणि जिल्हा प्रशासनाला कळविले जाते.

# ठाकरे सरकार काँग्रेसच्या दबावाखाली -फडणवीस

### 'द काश्मीर फाईल्स' टॅक्स फ्री करण्यास नकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र सरकार हे काँग्रेसच्या दबावाखाली आहे. काश्मीरबाबत बाळासाहेब ठाकरेंची भूमिका आणि आजचे उद्धव ठाकरेंच्या सरकारचे वर्तन यात जमीन-आस्मानाचा फरक आहे, अशी घणाघाती टीका करीत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. चित्रपट टॅक्स फ्री करून वेदना दाखवता येत नाहीत, अशा शब्दांत या प्रकरणावर प्रतिक्रिया देणाऱ्या संजय राऊतांना फडणवीस यांनी खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले की, कुठे ते बाळासाहेबांचे जाज्वल्य हिंदुत्व जे काश्मिरी पंडितांच्या पाठिशी उभे राहायचे आणि आज काश्मिरी पंडितांवर झालेला अत्याचार दाखवला, तरी तुम्हाला मिर्ची लागते. इतके कसे बदललात तुम्ही? ते दिल्लीत माध्यमांशी बोलत होते.





द काश्मीर फाईल्स सिनेमावरून सध्या देशभर मोठी चर्चा सुरू झाली आहे. काही भागात या सिनेमाच्या प्रदर्शनाला विरोध होत असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर देशातील इतर काही राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही हा सिनेमा टॅक्स फ्री करण्यात यावा, अशी मागणी थेट राज्याच्या विधानसभेत देखील करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही मागणी फेटाळून लावल्यानंतर त्यावरून भाजपकडून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. फडणवीस यांनी या मुद्द्यावरून शिवसेनेवर निशाणा साधला असून बाळासाहेबांच्या भूमिकेची आठवण करून दिली आहे.

दरम्यान, संजय राऊतांना काय सत्य माहिती आहे? ते कधी काश्मीरमध्ये गेले होते? या संघर्षाच्या काळात ते कधीच काश्मीरला गेले नाहीत, असे फडणवीस म्हणाले.

## राणे पिता-पुत्राला कोर्टाकडून दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी व्यवस्थापक दिशा सालियनबाबत वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात मंत्री नारायण राणे व आमदार नितेश राणे यांना दिंडोशी सत्र न्यायालयाने दिलासा दिलाय. न्यायालयाने राणे पिता-पुत्रांचा अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. त्यांच्याविरोधात मालवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयाचे नितेश राणे यांनी स्वागत केले असून यापुढेही जिथे अन्याय होईल तेथे आम्ही आवाज उठवणार असे त्यांनी म्हटलेय. नारायण राणे आणि मला दिशा सालीयन या प्रकरणामध्ये जामीन मंजूर केला आहे. काही अटीशर्तींवर आम्हाला जामीन मंजूर करण्यात आला आहे. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनीधींना जो अधिकार दिला आहे, त्या अधिकाराला अबाधित ठेवण्याचे काम न्यायालयाने केले आहे. मविआ सरकारने षडयंत्र रचले, दबाव टाकण्याचा प्रयत्न केला, असे नितेश राणे म्हणाले.

# सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून उद्यानांची पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वतीने महापालिका क्षेत्रातील उद्यानांची पाहणी करून त्यामध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यानुसार सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी (दि. १६) कळंबोली सेक्टर १० येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डनची पाहणी करून या उद्यानात लाईट, बेंच, वॉकींग ट्रॅक आणि साफसफाई संदर्भातील सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

या वेळी पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील, भाजप कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, उद्यान विभागीय अधिकारी राजेश कर्डिले, विद्युत विभाग अधिकारी प्रितम पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## गोवा, मणिपूरमध्ये मुख्यमंत्री बदलणार नाही; भाजपचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चार राज्यातील भाजपच्या दणदणीत विजयानंतर गोवा आणि मणिपूरच्या मुख्यमंत्रिपदाबाबत भाजपच्या पक्षनेतृत्वाने विद्यमान मुख्यमंत्री कायम राहणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता गोव्यामध्ये प्रमोद सावंत तर मणिपूरमध्ये बीरेन सिंह हे पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बीरेन सिंह व गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह भाजप नेत्यांनी भेट घेतली. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या.



# शेतकऱ्यांबाबत निर्णय घेण्यात राज्य सरकारची दिरंगाई

## भाजपचे ज्येष्ठ आमदार राधाकृष्ण विखे पाटील यांची 'मविआ'वर टीका

**अहमदनगर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यास कायमच दिरंगाई करते. त्याचाच एक भाग म्हणजे शेतकऱ्यांची वीज तोडणी करण्याचा निर्णय मागे घेणे हा असल्याची टीका भाजपचे ज्येष्ठ आमदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.



राज्यात महावितरणकडून सुरू असलेल्या सक्तीच्या थकबाकी वसुलीच्या कारवाईविरोधात भाजपने विविध ठिकाणी आंदोलने केली. विधानसभेतही सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे राज्य सरकारने ही कारवाई मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपने विधानसभेत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांनी केलेल्या संघर्षाचे यश असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

मागील अनेक महिन्यांपासून भाजप शेतकऱ्यांच्या कृषीपंपाची जोडणी तोडू नका, अशी मागणी करीत होतो. यासाठी आजपर्यंत झालेल्या सर्वच अधिवेशनात शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली. मात्र सरकारने याकडे दुर्लक्ष केले. डिसेंबरमधील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी उपमुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची वीजजोडणी तोडणार नाही, असा निर्णय जाहीर केला. मात्र महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आपली मोहीम सुरूच ठेवली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वीजेच्या प्रश्नावर निर्णय होत नाही, तोपर्यंत कोणतेही कामकाज चालू न देण्याचा निर्णय घेऊन भाजपच्या दबावामुळेच सरकारला आज झुकावे लागले, असेही ते म्हणाले.

## मोरा सागरी पोलीस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

**उरण : वार्ताहर**

मोरा सागरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध पुरावे कमजोर करण्यासाठी १० हजारांची लाच स्वीकारताना उपनिरीक्षक सागर पवार यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले आहे.

मोरा सागरी पोलीस ठाण्यात ९ मार्च २०२२ रोजी ३५४ कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपींविरुद्ध पुरावे कमजोर करण्यासाठी उपनिरीक्षक सागर पवार यांनी २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याप्रकरणी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे उपनिरीक्षक पवार यांच्याविरोधात १४ मार्च रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती. तडजोडीनंतर १० हजारांची लाच घेणाऱ्या सागर पवार यांच्याविरोधात कारवाई करण्यासाठी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला होता. मंगळवारी (दि.१५) मोरा येथील साईबाबा मंदिराजवळील रस्त्यावर १० हजारांची लाच स्वीकारताना उपनिरीक्षक सागर पवार यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी मोरा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**पनवेल : भाजपचे पंचशीलनगर झोपडपट्टी अध्यक्ष पप्पू साळवी यांना वाढदिवसानिमित्त बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक समीर ठाकूर, नगरसेविका राजश्री वावेकर, भाजप नेते महेंद्र वावेकर, विजय घुले, भीमराव जाधव, नामदेव रोकडे, अमोल घाडगे, सुनील निकाळजे, शोभा आडगावकर, गुरुनाथ मिठबावकर, भरत साळवे, परमेश्वर धोत्रे पाटील, अशोक तांबोळी, नरेश भोपी, सुधाकर पाटील उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिका नगरसेविका राजश्री वावेकर यांनी महिला दिनाचे औचित्य साधून हळदीकुंकू समारंभ आणि राज्यस्तरीय समूह नृत्यस्पर्धेचे आयोजन रविवारी केले होते. त्यानिमित्त राजश्री वावेकर यांची बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेऊन त्यांना सन्मनचिन्ह दिले. तसेच त्यांनी राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. या वेळी नगरसेवक समीर ठाकूर, भाजप नेते महेंद्र वावेकर उपस्थित होते.**

# महापालिका क्षेत्रात १२ ते १४ वयोगटातील लसीकरण सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिका क्षेत्रात १२ ते १४ वयोगटातील मुलांच्या लसीकरणास बुधवारी (दि.१६) सुरुवात झाली. लसीकरणासाठी १५ मार्च २००८ ते १५ मार्च २०१० या कालावधीत जन्मलेली मुले पात्र असणार आहे. कोविडपासून बचाव करण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपले लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्यासह आयुक्तांनी केले आहे.



उपजिल्हा रूग्णालयात महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला-बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेवक विक्रांत पाटील नगरसेविका रूचिता लोंढे, वैद्यकीय अधीक्षक अधिकारी डॉ. सचिन संकपाळ, आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, वैद्यकीय अधिकारी मनिषा चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्बेव्हॅक्स लसींच्या मात्रा पालिकेस मिळाल्या असून, शाळांनी विद्यार्थ्यांच्या याद्या पालिकेस देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या लसीकरणाचे नियोजन करण्यात येणार आहे. या लसीकरणासाठी विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड किंवा जन्मतारीख असलेले शाळेचे ओळखपत्र घेऊन येणे बंधनकारक आहे.

महापालिका क्षेत्रात नुकताच पल्स पोलिओ कार्यक्रम राबविण्यात आला. याअंतर्गत उत्तम कामगिरी बजावलेल्या आशासेविका, एनएम यांचा सत्कार करण्यात आला.

# कोळीवाड्यांच्या सीमांकनाचा प्रश्न अद्याप रखडलेलाच

## आमदार रमेश पाटील यांचा अधिवेशनात तारांकीत प्रश्न

**मुरूड : प्रतिनिधी**

मुंबईच्या काही भागातील कोळीवाड्यांचे तसेच कोकण किनारपट्टीवरील कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याबाबत अद्यापही राज्य शासनाने कोणतीही पाऊले उचललेली नाहीत. याबाबत कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपचे विधान परिषदेचे आमदार रमेश पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये उपस्थित केला.



गेल्या अनेक वर्षांपासून कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याचा प्रश्न प्रलंबितच आहे. पिढ्यान्‌पिढ्या कोळी बांधव मुंबईतील तसेच कोकण किनारपट्टीवर राहत असून ते येथील स्थानिक भूमिपुत्र आहेत. या कोळीवाड्यांचे तसेच गावठाणांचे सीमांकन करून स्थानिक भूमिपुत्रांना प्रॉपर्टी कार्ड देणे गरजेचे आहे.

प्रॉपर्टी कार्ड नसल्यामुळे या मूळ रहिवाशांना अनेक अडचणी येत आहेत. यासाठी आमदार रमेश पाटील अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत. मुंबईतील कोळीवाड्यांचे व गावठाणांचे सीमांकन करण्याचा निर्णय माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासनाने पावसाळी अधिवेशन २०१८ मध्ये घेतला. परंतु, महाविकास आघाडी सरकारच्या काळात हा सीमांकनाचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे.

याबाबत उत्तर देताना महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, मुंबईतील ४१ पैकी ३१ कोळीवाड्यांचे सीमांकन पूर्ण झाले आहे. उर्वरित कोकणातील जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण न झालेल्या गावठाणांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबईत काही ठिकाणी सीमांकनाबाबत विरोध असल्यामुळे यासंदर्भात लवकरच बैठक आयोजित करून सीमांकन करण्यात येईल.

## खोपोली-पेण रस्त्यावर रिक्षा अपघात

**खोपोली** : खोपोली-पेण राज्यमार्गावर साजगाव विठ्ठल मंदिरासमोर बुधवारी (दि.१६) सायंकाळी खोपोलीकडे येत असल्याने रिक्षेला अपघात होऊन चालकासह दोन महिला जखमी झाल्या. पेणहून खोपोलीकडे येणाऱ्या रिक्षेने वॅगनर कारला मागून धडक दिल्याने, रिक्षेवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि रिक्षा रस्त्याशेजारी झाडावर जाऊन धडकली. या अपघातात रिक्षाचालक चौधरी (रा. सावरोली) हे जखमी झाले आहेत. त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातील दोन महिलाही रिक्षेमध्ये होत्या. त्याही जखमी झाल्या. चालक चौधरी यांच्यासह एका महिलेला पनवेल येथे हलविण्यात आल्याची माहिती मिळत आहे. या अपघाताबाबत खोपोली पोलीस पुढील तपास करीत आहे.



## पान १ वरून

### भूमिपुत्रांचे दास्तान फाटा येथे आज रास्ता रोको आंदोलन

यामुळे कृती समिती कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांच्यासह कृती समितीचे सरचिटणीस भुषण पाटील, नवी मुंबई महानगरपालिका पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत, खजिनदार जे. डी. तांडेल, अतुल दि. पाटील, नंदराज मुंगाजी, रूपेश धुमाळ, राजेश गायकर, सुरेश पाटील, विनोद मात्रे, दीपक पाटील आदींनी आपला १७ मार्चच्या आंदोलनाचा निर्णय ठाम असल्याचे व सिडकोला प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य कराव्याच लागतील असा निर्धार व्यक्त केला.

### पनवेल मनपाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर भर

इंग्रजी माध्यमाची एक शाळा सुरू करणे, ई-लर्निंग संगणक प्रशिक्षण सेवा तीन कोटी व साहित्य पुरवण्याची तरतूद करण्यात आली आहे. महिला व बाल कल्याण विभाग २.५२ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये सी टॉयलेट ५० लाख रूपये, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती २५ लाख रूपये, राष्ट्रीय व राज्य पातळीवर क्रीडाक्षेत्रात प्रावीण्य मिळवणाऱ्या मुलींसाठी २० लाख, आदिवासी वाड्यातील महिला व कुपोषित बालकांसाठी २० लाख रूपये, दिव्यांगांसाठी पाच कोटी २६ लाख याअंतर्गत दिव्यांग धोरण राबविण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांचा डाटा गोळा करण्यात येणार आहे.

या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांकडे जास्त लक्ष देण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले. सिडकोने आजूबाजूचा परिसर विकसित करताना मूळ खांदा कॉलनीत कामे झालेली नाहीत. त्यामुळे तेथे भूमिगत गटारे नाहीत, पाण्याच्या पुरेशा पाइपलाइन नाहीत ही कामे हस्तांतरीत झाल्यावर महापालिकेला करणे गरजेचे आहे. यासाठी गावांचा विकास करण्यासाठी ४२ कोटींची खास तरतूद करण्यात आली आहे. सिव्हर लाइन क्लिनिंग हे मोठे काम आहे. सिडकोकडून सेवा हस्तांतरणानंतर ते आपले काम आहे. त्यासाठी भाड्याने मशीनरी परवडत नसल्याने १२ कोटी खर्च करून अत्याधुनिक जेटिंग मशीन ज्यामुळे माणसाला आत न उतरता सफाई करता येईल, अशी खरेदी करण्यात येणार आहेत.

पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी अहवाल तयार करण्यात आला आहे. आयआयटीला अहवाल तयार करण्यासाठी दिला आहे. एमआयडीसी असल्याने पोल्युशन होणार ते कंट्रोल करण्यासाठी एअर पोल्युशन मॉनिटरिंग मशीनसाठी ही तरतूद करण्यात आली आहे. शहराचा वाढता विस्तार, उंच इमारती यासाठी अग्निशमन व्यवस्था अत्याधुनिक करण्यासाठी गाड्या खरेदी करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या वेळी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नागरिकांना दिलासा देणारा आणि प्रगतीशील असा हा अर्थसंकल्प असावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील असू असे सांगितले.

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची सेतूबाधित मच्छीमारांसाठी एमएमआरडीएसोबत बैठक

एमएमआरडीएबरोबर अनेक वेळा झालेल्या बैठकीत स्थानिक मच्छीमारांच्या वतीने ७८९ बाधित मच्छीमारांची यादी सादर करण्यात आली होती. काही त्रुटी दूर करून सादर करण्यात आलेल्या यादीला मान्यता देताना आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र सातत्याने पाठपुरावा करूनही एमएमआरडीए आर्थिक नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करीत आहे. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी एमएमआरडीचे आयुक्त यांच्यासोबत बुधवारी बैठक घेतली. २०१६ ते २०१९ पर्यंत ज्यांनी फॉर्म भरले होते, त्यांना पैसे का दिले नाही? याबद्दल चर्चा होऊन योग्य तो निर्णय घ्या अन्यथा काम बंद केले जाईल, अशी रोखठोक भूमिका या बैठकीत घेण्यात आली होती. त्यावेळी आयुक्तांनी एमएमआरडीचे अधिकारी स्वतः या न्हावा भागात येऊन कागदपत्रांमधील त्रुटी दूर करतील, असे आश्वासन एमएमआरडीच्या वतीने देण्यात आले आहे.

याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी न्हावा व गव्हाण ग्रामपंचायतीला विकासकामांसाठी प्रत्येकी पाच कोटी निधी कधी देणार? अशी विचारणा केली. त्यावर लवकरच विकासकामांसाठी निधी देण्याचे एमएमआरडीच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांची शिष्टाई कामी आली आहे.




(पांडे सो)

**जाहीर नोटीस**

ॲड नितेश भरत घोडविंदे
अर्जदारातर्फे वकील
मो. नं. : ९५९४१५६३८३

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोटात**

फौजदारी चौ.अर्ज नं.३२०/२०२२
नि ७/ड
ने. ता. १८/०४/२०२२

श्री. शालीक महादेव म्हात्रे
वय ६४ वर्षे, धंदा - शेती,
रा. नेरेपाडा ता. पनवेल, जि.रायगड. } अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत नेरे } सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार यांचे आई कै. आनंदी महादेव म्हात्रे ही दिनांक २०/०४/२००२ साली मौजे रा. नेरेपाडा ता. पनवेल,जि.रायगड. येथे मयत झालेल्या असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्यांच्या मृत्यूची नोंद होणेकरीता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाख केलेला आहे.

सदरहू कै. आनंदी महादेव म्हात्रे ह्या वर नमुद तारखेस व ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक माहिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधिताना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि. १६/०३/२०२२ रोजी दिली.

सही/-
क. लिपिक
फौजदारी न्यायालय पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
फौजदारी न्यायालय पनवेल



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-29/21-22 7000022657 | Overhauling of CGL make 400kV Circuit Breaker at EHV level alongwith mandatory/non – mandatory spares at 400kV R.S. Kharghar. **Tender fee 500/- + GST** | Rs. 43.50 Lakhs |
| Tend-33/2021-22 7000021956 | Work of replacement of existing old 0.2 ACSR conductor of 100kV Apta – Thal, 100kV Apta –Jite & Jite – Thal with new 0.2ACSR conductor. **Tender fee 5000/- + GST** | Rs. 274.88 Lakhs |
| Tend-40/21-22 7000022636 | Supply Installation and commissioning of portable and programmable battery charger system (Universal charger) with DC voltage monitoring and selection scheme for 400kV R.S. Kharghar. **Tender fee 500/- + GST** | Rs. 15.69 Lakhs. |
| Tend-41/21-22 7000022655 | AMC Servicing /repairing of computers and printers at various S/stn under EHV (O&M) Circle, Panvel for the period 22-23 & 23-24. **Tender fee 500/- + GST** | Rs. 10.00 Lakhs |

EMD 1% of estimated cost of each tender. **Submission of bids from 16.03.2022 to 22.03.2022 up to 23.59 Hrs, Opening date 23.03.2022 upto 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 9167026141.

**Datta Jadhwar**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites E-Tender from registered SRM vendors on Mahatransco Website

| Sr. No. | Tender No. | Tender Name | Tender Amount | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | **E-Tender-10/2021-22 RFx No. 7000022567** | SRM E-Tender for the work of unloading of EHV materials / equipments by crane and labours at Major Stores, Panvel in FY 2022-23. | Rs. 398763/- | 23.03.2022 upto 23:59 Hrs. |

EMD amount Rs.5000/- & Tender fee Rs. 525/- for submission of bids
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:**
DYEE, Mob. No. 9930057633. AE, Mob. No. 9833904416

**SD/-**
**EE, MAJOR STORES, PANVEL**





**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### रसायनीत होळी सणाची जय्यत तयारी



**रसायनी** : होळी सणासाठी ग्रामीण भागात होळीमाळावर ग्रामस्थांनी लाकडे व शेणाच्या गोवऱ्या जमा करून होळी सजवण्यास सुरुवात केली आहे. गुरुवारी (दि. १७) सायंकाळी होळीची पारंपरिकरित्या पूजा करून लगेचच होळी पेटवली जाईल. होळीला सजवण्यासाठी रंगीत बत्ताशाच्या माळा सगळीकडे दिसून येत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून बंधने असल्याने साध्या पद्धतीने होळीचा सण साजरा करण्यात आला, मात्र आता निर्बंध शिथिल करण्यात आल्याने नागरिकांमध्येही उत्साह संचारला आहे.

### उरणमध्ये गांधीसंस्कार परीक्षा

**उरण** : कोकण ज्ञानपीठ वाणिज्य व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य स्तरावर घेतली जाणारी गांधीसंस्कार परीक्षा पार पडली. ही परीक्षा भारताचे राष्ट्रपीता महात्मा गांधीजी यांच्या जीवन व कार्यावर आधारित होती. विद्यार्थ्यांमध्ये नितीमूल्य, संस्कार, संयम, त्याग, समर्पण, देशभक्तीची भावना विकसित व्हावी यासाठी ही परीक्षा घेण्यात येते. प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागदर्शनाखाली पार पडलेल्या या परीक्षेत एकूण १३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा. लिटन कुमारी, प्रा. श्वेता गुप्ता, प्रा. मयुरी मढवी यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. एच. के. जगताप यांनी सदर परिक्षेच्या आयोजनात मेहनत घेतली.

### लिमये वाचनालयात महिलांसाठी व्याख्यान

**पनवेल** : शहरातील के. गो. लिमये वाचनालयात महिला दिनानिमित्त डॉ. संजीवनी गुणे व डॉ. समिधा गांधी यांचे व्याख्यान झाले. या वेळी डॉ. संजीवनी गुणे यांनी स्त्रीत्वाची प्रतिमा कशी जपली जाईल याबाबत मार्गदर्शन केले. तर डॉ. समिधा गांधी यांनी गरजू महिलांना मदतीचा हात दिला तर अनेक समस्या सुटण्यास मदत होईल असे सांगितले. कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सुनिता जोशी, सहकार्यवाह जयश्री शेट्ये, हिमालीनी कुलकर्णी, अरूणा सांगळे, अ‍ॅड. माधुरी थळकर, विनायक वत्सराज, वसुधा वत्सराज, काशिनाथ जाधव, श्याम वालावलकर, हेमा गद्रे, अंकिता कदम, निर्मला म्हात्रे, दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.



# आवक घटल्याने मासळीचाही भाव वधारला!

## पापलेट, कोळंबी, सुरमई प्रतिकिलो १००० ते १२०० रुपये

**उरण : रामप्रहर वृत्त**

सध्या महागाईने उच्चांक गाठला असतानाच आवक घटल्याने मासळीचाही दर वधारला आहे. होळी व धुळवडीच्या निमित्ताने खवय्ये मासळीला पसंती देतात, मात्र या वर्षी मासळीसाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. पापलेट, कोळंबी व सुरमई या मासळीचे दर प्रतिकिलोला एक हजार ते १२०० रुपयांवर पोहचले आहेत.

सातत्याने वातावरणातील बदल, शासनाच्या जाचक अटी, मच्छीमारांचे रखडलेले अनुदान आदी कारणांमुळे मच्छीमार बांधवांना आता मासेमारी करणे जीकिरीचे झाले आहे. त्याचप्रमाणे सध्या मासळीचा हंगाम नसून होळीसाठी अनेक बोटी किनाऱ्यावर परतल्या आहेत. त्यामुळे मासळी आवक घटल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे. होळी आणि धुळवडीच्या दिवशी मटण, मासे याला मागणी असते. मात्र यावर्षी त्यांना मासळीसाठी दुप्पट पैसे मोजावे लागणार आहेत. ४०० ते ६०० रूपये किलो असलेल्या कोळंबीचा दर एक हजार रुपये सुरमई व पापलेट ६०० ते ७०० रुपयांवरून १२०० रुपयांवर पोहचला आहे.

शेतकऱ्यांप्रमाणेच राज्यातील मच्छीमार बांधवांच्या समस्याही अद्याप राज्य शासनाकडून सोडवण्यात आलेल्या नाहीत. राज्यातील १६० मच्छीमार सहकारी संस्थामधील ९,६४६ यांत्रिकी नौकांना शासनाकडून मंजूर करण्यात येत असलेल्या डिझेल कोट्यामधील खर्चाच्या परताव्याची १८६ कोटी थकीत रक्कम मच्छीमारांना उपलब्ध करून दिली नसल्याचे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्य सरकारच्या निदर्शनास आणले होते. या मच्छीमार संस्थांना १०० टक्के डिझेल परतावा मिळावा, अशी मागणीही त्यांनी अधिवेशनात केली आहे.



**मासळीला मोजावे लागणार दुप्पट पैसे**

यावर्षी मासळीसाठी दुप्पट पैसे मोजावे लागणार आहेत. ४०० ते ६०० रूपये किलो असलेल्या कोळंबीचा दर एक हजार रुपये सुरमई व पापलेट ६०० ते ७०० रुपयांवरून १२०० रुपयांवर पोहचला आहे.

**सध्या मासळीचा मोठा हंगाम नाही. त्यात होळीसाठी बोटी किनाऱ्यावर आल्या आहेत. त्यामुळे मासळीच्या प्रमाणात घट झाल्याने दरात वाढ झाली आहे. साध्या मासळीवर समाधान मानावे लागत आहे. होळीनंतरच आवक वाढण्याची शक्यता आहे.**

**–सुधीर पाटील, मच्छीमार**



### रसायनीत मुद्देमालासह चोरट्याला अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा परिसरातील भोकरपाडा येथील एका सोसाटीतील फ्लॅटमधून चोरट्याने सोन्याचे दागिने व काही रक्कम चोरल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पोलिसांनी तातडीने आरोपीला मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

भोकरपाडा येथील हिरानंदानी फार्च्युन सिटी येथील एका महिलेच्या फ्लॅटमध्ये घरामध्ये कोणीही नसल्याचा फायदा घेत चोरट्याने डल्ला मारून सोन्याचे मंगळसूत्र व कानातले तसेच रोख ५०० रुपये लंपास केले होते. घरी परतल्यावर त्या महिलेच्या घरात चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.



यानुसार रसायनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांनी तपासाची चक्रे फिरवून आरोपीला ताब्यात घेतले. तसेच तपासाअंती मुद्देमाल जप्त करून महिलेच्या ताब्यात दिल्याने महिलेने त्यांचे आभार मानले.

### होळी सणालाही महागाईची झळ

नैसर्गिक रंगांसह पिचकारी व फुग्यांच्या दरात वाढ

**पनवेल : वार्ताहर**

होळी म्हटल्यावर सर्वांत जास्त उत्साह बच्चेकंपनीला असतो. त्यातही या रंगांच्या उत्सवामध्ये पिचकारी खरेदी करण्यासाठी मुलांचा उत्साह द्विगुणीत होतो. मात्र, या वर्षी पिचकारीच्या दरात २० टक्क्यांहून अधिक तर रंगांच्या दरात ३० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे दुकानदारांनी सांगितले. त्यामुळे सणांनाही आता महागाईची झळ बसण्यास सुरुवात झाली आहे.

गेली दोन वर्षे सर्वच सणांवर कोरोनाचे सावट होते, मात्र फेब्रुवारी महिन्यात बाधितांचे प्रमाण खूप कमी झाले असून शासनाने निर्बंध देखील हटविले आहेत. त्यामुळे यावर्षी पिचकारी आणि रंगाच्या खरेदीस चांगला प्रतिसाद मिळणार असल्याचा विश्वास दुकानदारांना वाटतो.

पनवेल परिसरातील बाजारपेठ प्राणी-पक्षांपासून ते कार्टुन्सच्या विविधरंगी पिचकाऱ्यांनी भरली आहे. या पिचकाऱ्यांच्या किंमती ५०० ते ७०० रुपयांच्या दरम्यान आहेत. तसेच विविध रंगांच्या दरात यावर्षी वाढ झाली असून ती ७० ते ८० रुपये किलोप्रमाणे विक्री केले जात आहे. गेली दोन वर्षे व्यवसाय ठप्प होता. मात्र, यावर्षी कोरोनाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे ग्राहकांच्या संख्येत भर पडत असल्याचे दुकानदारांनी सांगितले.

**कोरोनाचे प्रमाण कमी झाले असून शासनानेदेखील निर्बंध हटविले आहे. त्यामुळे कोरोनाची भीती कमी झाली आहे. ग्राहकांच्या संख्येत वाढ होईल यासाठी विविध प्रकारच्या पिचकारी विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. किंमतीत देखील २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. दोन वर्षे व्यवसाय ठप्प होता. यावर्षी व्यवसाय पूर्वीप्रमाणे होईल, असे वाटते.**

**–यशवंत शेटे, दुकानदार, पनवेल.**

### सीकेटी महाविद्यालयात ‘एक सूर एक ताल’ कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



प्रदूषणमुक्त पर्यावरणाचे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महत्त्व विषद करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) चे राज्यशास्त्र विभाग तथा युवक बिरादरी भारत, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सीकेटी महाविद्यालयात रविवारी (दि.१३) सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्रशांत वाघये व नागेंद्र राय यांच्या नेतृत्वाखाली ‘एक सूर-एक ताल’ कार्यक्रमाचे युवक बिरादरी भारत मुंबई यांच्या चमूने सादरीकरण केले. यामध्ये पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी दर्शविणाऱ्या गाण्यांची तथा विद्यार्थ्यांना सहभागी करून नृत्ये आणि कव्वाली सादर केल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते झाले. प्रकल्पाचे संचालक प्रशांत वाघये यांनी, युवक बिरादरीच्या युवा संसद, प्रज्ञाशोधसारख्या उपक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या सक्रीय सहभागाबाबत कौतुक केले. तसेच २०२१-२०२२ च्या युवा संसदेत सर्वोत्कृष्ट संसदपटू म्हणून प्रिया चौधरी आणि सर्वोत्कृष्ट लोकसभा अध्यक्ष म्हणून नेहा कुलकर्णी यांचा विशेष उल्लेख केला.

प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.एस.के. पाटील यांनी या नावीन्यपूर्ण सादरीकरणाबाबत आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. एस. पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.राजेश येवले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आकाश पाटील, सांस्कृतिक समन्वयक प्रा. गणेश जगताप, सीकेटी यीन फोरमच्या सहसमन्वयिका प्रा. अपूर्वा ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतक केले.

### भाजपच्या आशा मुंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या खांदा कॉलनी येथील महिला मोर्चा सरचिटणीस आशा मुंडे यांना जय भगवान राष्ट्रीय सेवा महाशक्ती या संस्थेतर्फे महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय महिला सामाजसेविका पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.



जय भगवान राष्ट्रीय सेवा महाशक्ती संस्थतर्फे हा पुरस्कार सोहळा मंगळवारी (दि.१५) ऑनलाइन पद्धतीने पार पडला. भारतीय जनता पक्षाच्या खांदा कॉलनी येथील सरचिटणीस आशा मुंडे यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय महिला सामाजसेविका पुरस्कार देण्यात आला. या वेळी जय भगवान राष्ट्रीय सेवा महाशक्ती संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष भाऊसाहेब फड, राष्ट्रीय महिलाध्यक्षा सुदामती मुंडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष विठ्ठलराव बडे, राष्ट्रीय महासचिव श्रीनिवास गिते, राष्ट्रीय कार्याध्यक्ष किसनराव सांगळे, डॉ. प्रा. अनिल डांगर, राष्ट्रीय महिला सचिव सुशिला फड, राज्य महिला संपर्कप्रमुख विद्या घुगे आदी मान्यवर उपस्थित होते. आशा मुंडे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### उरण महाविद्यालयात ग्राहक हक्क दिनानिमित्त मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात ग्राहक हक्क दिन मंगळवारी (दि.१५) डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स व डिपार्टमेंट ऑफ लाईफ लाँग लर्निंग एज्युकेशन अँड एक्सटेन्शनच्या वतीने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात सिनियर प्रा. के. ए. शामा यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक हक्क दिनाचे महत्त्व विषद केले. तसेच ग्राहकांचे सहा मूलभूत हक्कांविषयी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी ग्राहकांची तक्रार कशी व कोठे करावी याबद्दलचे विवेचन उदाहरण देऊन स्पष्ट करण्यात आले. यामध्ये प्रचिती माळी, अक्षता विमल व जागृती भोईर या विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना युट्यूबद्वारे ग्राहकांचे हक्क व तक्रार निवारणाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. एच. के. जगताप, प्रा. आर. टी. ठवरे, डॉ. डी. पी. हिंगमिरे, डॉ. एम. जी. लोणे, प्रा. रियाज पठाण व प्रा. मयुरी मढवी, डॉ. पी. आर. कारुळकर उपस्थित होते.



### किडनी प्रत्यारोपणासाठी अपोलो हॉस्पिटल्सचा पुढाकार

**पनवेल : प्रतिनिधी**




अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने २०० पेक्षा जास्त किडनी ट्रान्सप्लांट्स तीन वर्षांत यशस्वीपणे पूर्ण केला असल्याचे अपोलो हॉस्पिटल्सचे कन्सल्टन्ट रोबोटिक युरॉलॉजिस्ट आणि रीनल ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अमोलकुमार पाटील यांनी सांगितले. या संदर्भात माहिती देण्यासाठी नवी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, अपोलो हॉस्पिटल्समध्ये सर्जिकल तंत्रज्ञानाचे सतत अपग्रेडेशन केले जाते. यामुळे सर्जरीनंतर होणाऱ्या वेदना चांगल्या पद्धतीने नियंत्रणात ठेवता येतात आणि शरीरावर सर्जरीच्या खुणा देखील राहत नाही. भारतासह येमेन, रवांडा, केनिया व सुदानमधील १५ परदेशी रुग्णांवर किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी यशस्वीपणे करण्यात आल्या.

चीफ कन्सल्टन्ट नेफ्रोलॉजिस्ट आणि ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ. अमित लंगोटे यांनी सांगितले, आम्हाला अनेक गंभीर रुग्णांची मदत करण्याची संधी मिळाली, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. कन्सल्टन्ट नेफ्रोलॉजिस्ट आणि किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ. रवींद्र निकलजी यांनी सांगितले, प्रत्यारोपणानंतर एकूण आरोग्य आणि जीवनाची आरोग्यासंबंधी गुणवत्ता यामध्ये सुधारित तंत्रज्ञान आणि अधिक चांगल्या इम्युनोसप्रेशनमुळे सुधारणा झाली आहे. एक निरोगी वयस्क व्यक्तीदेखील तब्येतीवर कोणताही गंभीर परिणाम न होता दुसऱ्या व्यक्तीचे प्राण वाचवण्यासाठी दाता बनू शकते ही जागरूकता निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत.

जॉईंट मेडिकल डायरेक्टर डॉ. रवी शंकर यांनी सांगितले, आम्हाला आनंद आहे की, किडनी ट्रान्सप्लांटमध्ये आमच्या सेंटर ऑफ एक्सेलन्समध्ये किडनी ट्रान्सप्लांटची वाढती मागणी यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक विशेषज्ञता व अनुभव आहे. रिजनल सीईओ वेस्टर्न रिजन संतोष मराठे यांनी सांगितले, भारतात पहिली ऑर्गन ट्रान्सप्लांट रजिस्ट्री विकसित करण्यापासून काही महत्त्वाच्या किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी करण्यापर्यंत, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामार्फत रुग्णांचे जीवन सुसह्य करीत आहे. याचा आम्हा सर्वांनाच सार्थ अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

### फडके विद्यालयात माता पालकांसाठी प्रदर्शन व विक्री मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके विद्यालयाने आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावणाऱ्या माता पालकांसाठी आंतरराष्ट्रीय महिला दिन व गुढीपाडवा असा मेळ साधून ’प्रदर्शन व विक्री’ मेळव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मानसी वैशंपायन प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. शाळेतील माता पालकांना वस्तू प्रदर्शित तसेच विक्री करण्यासाठी आमंत्रित केले होते. सहभागी सदस्य आणि उपस्थित पालक प्रतिनिधीनी आयोजित व्यवस्थेचे तसेच महिला पालकांना उपलब्ध करून दिलेल्या संधीचे कौतुक केले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शीतल साळुंखे यांनी, महिला पालकांना व्यासपीठ मिळवून देणे आणि यशस्वी उद्योजक म्हणून त्यांचा सन्मान करणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.



### राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १२

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. देशात या उन्हाळ्यात एका आठवड्याला इतक्या देशांतर्गत विमानांचे उड्डाण होणार आहे.**
**अ.** १० हजारांपेक्षा अधिक **आ.** २५ हजारांपेक्षा अधिक
**इ.** पाच हजारांपेक्षा अधिक **ई.** १५ हजारांपेक्षा अधिक

**२. भारतातील सध्याच्या एकूण विमानतळांची संख्या किती आहे?**
**अ.** ११२ **आ.** १५० **इ.** ९० **ई.** ५०

**३. महाराष्ट्रातील कोणत्या विमानतळावरून या आठवड्यात विमानसेवा सुरू होणार आहे?**
**अ.** शिर्डी **आ.** सिंधुदुर्ग **इ.** नाशिक **ई.** गोंदिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# कालचा गोंधळ बरा होता!

विद्यार्थ्यांची भयग्रस्तता ओळखून तसेच कोरोना प्रतिबंधक काळजी स्वत:च्या शाळेत अधिक चांगल्या प्रकारे घेतली जाईल या भावनेने बोर्डाच्या परीक्षांचे केंद्र पालक शाळेतच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु हा निर्णय घेतल्यानंतर परीक्षांमध्ये गैरप्रकार होणार नाहीत याची खबरदारी घेण्यासाठी विशेष उपाययोजनेची आवश्यकता होती, मात्र निर्णयक्षमता आणि कार्यक्षमता यांची वानवा असलेल्या महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात कोणत्याही विशेष उपाययोजनेची अपेक्षाच कुणी कशी काय करू शकते? सर्वस्तरीय परीक्षांमध्ये निव्वळ गोंधळच होताना गेली दोन वर्षे दिसत आला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षांमध्येही तूर्तास तेच घडते आहे.

**कोरोना महामारी सुरू झाल्यापासून गेली दोन वर्षे राज्यात सर्व स्तरांवर सुरू असलेला शैक्षणिक खेळखंडोबा संपुष्टात येण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. महामारीच्या काळात शिक्षणाचे स्वरुप ऑनलाइन करणे भाग पडले आणि सर्व स्तरांवर विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना त्यातील त्रुटींचा पुरेपूर अनुभव आला. अर्थात तसे असले तरी महामारी आटोक्यात आल्यानंतरही विद्यार्थ्यांना पुन्हा वर्गांमध्ये आणणे व त्यांच्या परीक्षा पूर्वीसारख्या पद्धतीने अर्थात ऑफलाइन घेणे सोपे जाणार नाही हेही एव्हाना पुरते स्पष्ट झाले आहे. दोन वर्षे शाळा-कॉलेजांतील प्रत्यक्ष शिक्षणापासून दूर राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात यंदा दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांविषयी नेहमीपेक्षा कितीतरी अधिक धास्ती असणार हे उघडच होते. त्यामुळे स्वत:ची शाळाच परीक्षा केंद्र म्हणून देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला, परंतु या निर्णयाचा गैरप्रकार करण्याची आयती संधी समजून वापर राज्यभरात सध्या सुरू आहे. कोणत्याही शाळेत पेपरफुटीचे प्रकरण आढळल्यास त्या शाळेची मान्यता काढून घेतली जाईल अशी घोषणा शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी विधान परिषदेत आता केली असली तरी, ना-ना तऱ्हेच्या शक्कली लढवून आपल्या विद्यार्थ्यांना परीक्षेत मदत करू पाहणाऱ्या शाळांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता कमीच आहे. परीक्षेच्या वेळेपूर्वी पेपर फुटणे, व्हॉट्सअॅपवरील विद्यार्थ्यांच्या ग्रुपवर संबंधित प्रश्नांची उत्तरे पाठवणे, परीक्षा केंद्रांवर फळ्यांवर उत्तरे लिहून देणे अथवा परीक्षार्थ्यांना पुस्तके सोबत घेऊन बसण्याची मोकळीक देणे यांसारखे प्रकार घडत असल्याचे समोर आले आहे. परीक्षा साडेदहा वाजता सुरू होत असली तरी अनेक शाळांमध्ये दहा वाजताच प्रश्नपत्रिकांचे संच उघडले जातात आणि पुढील सर्व गैरप्रकारांना वाट करून दिली जाते असे समजते. या प्रकारांमुळे लेखी ऑफलाइन परीक्षा घेण्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे. काही तुरळक शाळांचा अपवाद वगळता बहुतेक शाळांमध्ये कमी-अधिक प्रमाणात हे प्रकार सुरू असल्याची चर्चा असून अर्थातच प्रामाणिकपणे कठोर मेहनतीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर या साऱ्या प्रकारांतून अन्याय होणार हे स्पष्ट आहे. हे सारे गैरप्रकार सुरू असताना ते रोखण्याच्या कामी नेमलेली भरारी पथके नेमकी काय करत असतात हा संशोधनाचाच विषय आहे. कोरोना महामारीमुळे मागील म्हणजे २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्यात आले होते. निकालांवर त्याचा भलताच विपरित परिणाम झाल्याचे दिसून आल्याने परीक्षांची गुणवत्ता कायम राखायची असेल तर लेखी, ऑफलाइन परीक्षाच व्हायला हव्यात असा विचार पुढे आला होता, परंतु दहावी-बारावीच्या ऑफलाइन परीक्षांमध्ये राज्यभरात सुरू असलेले गैरप्रकार पाहता कालचा गोंधळ बरा होता, असे म्हणण्याची पाळी आली आहे.**

# पोलादपूर पंचायत समितींची आमसभा

## खबरबात
शैलेश पालकर

महाराष्ट्रातील २९ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये प्रत्येक तालुक्यात पंचायत समिती आहे. पंचायत समिती मतदार संघाला गण असे म्हणतात. १७,५०० लोकसंख्येचा एक गण असतो. लोकसंख्येनुसार प्रत्येक पंचायत समितीमध्ये जिल्हा परिषद मतदार संघांच्या दुप्पट गण निर्माण केले आहेत. प्रत्येक गणातून एक सदस्य निवडण्यात येतात. मतदार प्रत्यक्ष मतदान पध्दतीने आपला प्रतिनिधी निवडून पंचायत समितींवर पाठवितात. पंचायत सदस्यांच्या काही जागा राखीव आहेत. अनुसूचित जातीच्या लोकांकरीता त्या पंचायत समितीच्या क्षेत्रात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असतात. महिलांकरीताही राखीव जागा असतात. त्यात अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव जागांचा समावेश असतो. राखीव सदस्यांची निवड फिरत्या मतदार संघातून प्रत्यक्ष निवड पध्दतीने होते. जिल्हा परिषदेच्या सदस्यांना पंचायत समितीचे सदस्य मानण्यात येत नाही. जिल्हा परिषदेची मुदत पाच वर्षे असते. पंचायत समिती सदस्यांच्या निवडणुकीनंतर पंचायत समितीचे सभापती व उपसभापती यांची निवड होते. पंचायत समिती सदस्यांपैकी एकाची सभापती म्हणून व दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड करतात. ही निवड पंचायत समितीच्या पहिल्या सभेत होते. निवडणुक प्रक्रिया जिल्हाधिकारी अगर त्यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत घेतली जाते. पंचायत समितीचा सेक्रेटरी किंवा सचिव म्हणून गटविकास अधिकारी काम पाहतात. पंचायत समितीच्या सभा दरमहा होतात. एका सभेनंतर दुसरी सभा ३० दिवसांच्या आत बोलविण्यात येते. या सभांना सर्वसाधारण सभा म्हणतात. वर्षातून नियमितपणे १२ किंवा १२ पेक्षा जास्त मासिक सभा होतात. परंतु गरज भासल्यास विशेष सभा घेण्याची तरतूद कायद्यात आहे.

गंभीर स्वरूपाच्या कोणत्याही कारणास्तव पंचायत समिती विसर्जित केली गेल्यास विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिने पूर्ण व्हायच्या आत नव्याने निवडणूक घेणे बंधनकार आहे. मात्र जिल्हा परिषदेप्रमाणे पंचायत समितीमध्ये विविध विषय समित्या नाहीत. परंतु सरपंचाची उपसमिती नेमण्याची तरतूद आहे. अशी साधारणपणे स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना असते.

मात्र, पोलादपूर तालुक्यात आमसभा आणि आमसभा चालविणाऱ्या व्यासपिठावरील मान्यवरांना कधीच आमसभेच्या कामकाजाच्या पध्दतीचे ज्ञान देण्यात न आल्याने सर्व नियम आणि संकेतांची पायमल्ली करीत गेली अनेक वर्षे आमसभेचे कामकाज चालत होते. मात्र २०१७ पासून आमसभेचे कामकाज अनियमितपणे चालविले जाऊ लागले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक पीआरसी १०७७३९१८(७१०) (३) बारा दि.९ मे १९७८ नुसार पंचायत राज समितीच्या शिफारसीनुसार पंचायत समितीच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी पोलादपूर पंचायत समितीची वार्षिक आमसभा आयोजित करण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत सातत्याने पोलादपूर तालुक्यातील पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा मागे ठेऊन महावितरण, एसटी महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, नोंदणी कार्यालय, भूमिअभिलेख कार्यालय तसेच अन्य राज्यसरकारच्या अखत्यारीतील कार्यालयांच्याच कामकाजाचा आढावा आमसभेत घेतला जात असतो. आमसभेमध्ये पोलादपूर नगरपंचायतीच्या कामकाजाबाबतचे प्रश्नदेखील विचारण्याचा नियमबाहय प्रकार घडण्याची शक्यता आहे. पंचायत राज समितीच्या शिफारसीनुसार पंचायत समितीच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी आमसभेचे आयोजन या नियमाकडे दूर्लक्ष होण्याची शक्यता आहे.

पंचायत राज समितीच्या शिफारसीनुसार ३१ मार्चला संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा आढावा घेण्यासाठी पंचायत समिती अंतर्गत समाविष्ठ योजना, कार्यालये व आस्थापनांचा विचार करण्याऐवजी आमजनतेला विविध प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रवृत्त करून आमसभाध्यक्षांना आढावा घेण्यासाठीही मुभा देण्याचा प्रकार पोलादपूर पंचायत समितीने गेल्या १३ वर्षांपासून सुरू केला आहे. यामुळे प्रत्यक्ष आमसभा होण्यापूर्वी अडचणींच्या प्रश्नांना बगल देण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात केले जात असल्याचे दिसून आले आहे.

विविध खात्यांबाबतचे लेखी प्रश्न व विकासकामांतील काही प्रश्नांना लेखी स्वरूपात विचारण्यासाठी सचिव तथा गटविकास अधिकारी यांच्याकडून होणारे आवाहन हेदेखील काही अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी तसेच प्रश्नकर्त्यांना मॅनेज करण्यासाठी उपयुक्त ठरल्यामुळे अनेकदा प्रश्नकर्ते नागरिक हे अडचणीचे प्रश्न विचारून अधिकाऱ्यांना वेठीस धरून आर्थिक कमाई करीत असल्याची आकडेवारीदेखील चर्चेतून जगजाहिर झाली आहे.

पंचायत समितीच्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन राज्यसरकार आणि राज्यसरकारचे अंगीकृत उपक्रम असलेल्या महावितरण आणि एसटी महामंडळाबाबतचे प्रश्न विचारून आमसभेचा पुष्कळसा वेळ वापरण्याचे कसबही पोलादपूर पंचायत समितीच्या आमसभेत विनाकारण वापरले जात आहे. अनेकदा या आमसभेमध्ये विविध योजनांचे वाटप, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार तसेच अन्य बिनकामाच्या गोष्टींना जास्त महत्व दिल्याचे दिसून येते. तर आमसभेच्या अध्यक्षांकडून अर्वाच्च भाषा वापरून प्रश्नकर्त्यांचा आवाज दडपण्याचे सामर्थ्य तडजोडीतून निर्माण झाल्याचे दिसून येते.

अगदीच सर्व उहापोह फार मोठया प्रमाणात झाला तर आमसभेच्या इतिवृत्तातून या प्रश्नांचा उहापोह गायब करण्याचे कसब दाखविण्यात येते. त्याउपरही असे गाजलेले प्रश्न इतिवृत्तामध्ये आलेच तर त्याबाबत काहीही कार्यवाही न करण्याची मानसिकता दिसून येते.

यंदापासून आमसभाध्यक्ष नियमानुसार आमसभा चालवतील अथवा जनतेला या व्यासपिठावर नियमात बसत नसूनही प्रश्न मांडण्याचे खुले व्यासपिठ उपलब्ध करून देतील, यावरच सभेचे कामकाज नियमानुसार होणे अवलंबून आहे. पण गेल्या दशकात आमसभेच्या आयोजनाची संख्या नगण्य असल्याने आमजनतेला आमसभेबाबात सोयरसुतक राहिले नसल्याचे दिसून येत आहे.

# कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये नुकताच पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ३५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश ब्राह्मणकर यांनी या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक अहवाल सादर केला. प्रा. अनुप कुंटे यांनी प्रास्ताविक केले. आपण निवडलेल्या क्षेत्रात एक नंबरला राहण्याचा प्रयत्न करा व मेहनत करून संधीचे सोने करा, असा सल्ला महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. व्ही. भगत यांनी केले. उरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य राजेश लाड, प्रकाश पालकर, दीपक बोराडे, ज्ञानेश्वर जाधव, उपप्राचार्य राजकुमार नारखेडे, प्रा. जी. एस. धानोरकर, प्रा. एस. एम. पाटील, प्रा. जी. व्ही. दाखवे संदीप लाड, राहुल देशमुख, अनिल घरत, गजानन लाड, निश्चल शिंदे, किरण पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

(छाया : विजय मांडे)




# मुरूडमध्ये जागतिक ग्राहक दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

ग्राहकांमध्ये हक्क आणि कर्तव्याबद्दलची जागरूकता वृध्दींगत करण्यासाठी ग्राहक दिन साजरा केला जात असल्याचे प्रतिपादन मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे यांनी मंगळवारी (दि. १५) येथे केले.



(छाया : संजय करडे)

जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात तहसीलदार शिंदे बोलत होते. या वेळी एनएसएस विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांचे संगोपन केले तरच पर्यावरणाचे संरक्षण होवू शकेल, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

मुरूडचे नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, पुरवठा अव्वल कारकून आर. नाखवा, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, एनएसएस कार्यक्रम अधिकारी श्रीशैल बहिरगुंडे, अॅड. इस्माईल घोले, माजी उपनगराध्यक्ष अतिक खतिब, डॉ. मधुकर वेदपाठक, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. नारायण बागुल, डॉ. देविदास रौदळ, कृषि अधिकारी विश्वजीत अहिरे, सचिन राजे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या प्रांगणात चिंच, आंबा, फणस, पेरू व इतर झाडांची लागवड करण्यात आली.



# अलिबाग येथे बेलीफ महासंघाची सभा

**अलिबाग : प्रतिनिधी**

ठाणे, रायगड जिल्हा न्यायालयीन बेलीफ कर्मचारी संघटनेच्या विद्यमाने महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलीफ कर्मचारी महासंघाची सभा नुकतीच अलिबागमधील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात संपन्न झाली.

रायगडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधिश विभा इंगले, जिल्हा व सत्र न्यायाधिश आर. जी. मलशेट्टी, अधीक्षक पालवणकर, बेलीफ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश कुलकर्णी यांच्यासह ठाणे व रायगड जिल्ह्यातील सर्व बेलीफ बांधव, राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी बेलीफ या सभेला उपस्थित होते.

ठाणे रायगड जिल्हा न्यायालयीन बेलीफ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुधाकर तु. कर्ले यांनी प्रास्ताविकात बेलीफ कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाज येणाऱ्या अडचणी मांडल्या व त्यावर उपाययोजना करण्याची विनंती केली. संघटनेचे महेंद्र भोसले, दिनेश कृष्णा पाटील, नंदकुमार द. पालवणकर, बिपीन मोरे, तुषार पाटील, विनोद नाईक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

रायगडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधिश विभा इंगले तसेच जिल्हा व सत्र न्यायाधिश मलशेट्टी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महासंघाचे अध्यक्ष प्रकाश कुलकर्णी यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले.

# माथेरानच्या विद्यार्थ्यांची रोज बारा किमी पायपीट

## ई-रिक्षा सुरू करण्याची मागणी

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमधील अनेक विद्यार्थ्यांना आपल्या शाळा, महाविद्यालयात जाण्या-येण्यासाठी रोज किमान १२ किलोमीटरची पायपीट करावी लागते. माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू झाल्यास या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

माथेरान या पर्यटन स्थळावर मोटार वाहनांना बंदी आहे, त्यामुळे पायी किंवा घोड्यांच्या सहाय्याने माथेरानमध्ये वाहतूक व्यवस्था करावी लागते. येथील स्मित सखाराम खाडे हा विद्यार्थी कर्जत येथील आयटीआयमध्ये हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करतो. त्याला रोज घरापासून सहा किमी. अंतर चालत जाऊन दस्तुरीनाका येथील टॅक्सी स्टॅण्ड गाठावे लागते. तेथून तो टॅक्सीने नेरळ व रेल्वेने कर्जत येथील आयटीआयमध्ये पोहचतो. तेथील काम पूर्ण करून तो पुन्हा लोकल पकडून नेरळ आणि तेथून टॅक्सीने दस्तुरीनाका येथे पोहचतो. तेथून सहा किलोमीटरची पायपीट करून तो घर गाठतो. त्याची ही पायपीट नित्याची झाली आहे.



(छाया : संतोष पेरणे)

स्मित खाडे याच्याप्रमाणेच येथील अनेक विद्यार्थी शाळा, महाविद्यालयात जाण्यासाठी दररोज किमान चार किलोमीटर पायी प्रवास करीत असतात. त्यांची पायपीट आणि पाठीवर पुस्तकांचे ओझे लक्षात घेऊन माथेरानमधील हातरिक्षा संघटनेने ई रिक्षा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याला यश आल्यास या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल.

# माणगावच्या सायराबानू चौगुले यांच्या लेखास राज्यस्तरावर प्रथम क्रमांक

**माणगाव : प्रतिनिधी**

पुण्यातील विधिज्ञ प्रकाशनच्या वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये माणगावमधील लेखिका सायराबानू वजीर चौगुले यांच्या 'नारी तुझी कथा आणि व्यथा' या लेखास प्रथम क्रमांक मिळाला.

विधिज्ञ प्रकाशन संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त केसरीवाडा पुणे येथील लोकमान्य सभागृहामध्ये स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात सायराबानू चौगुले यांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम तसेच विधिज्ञ वार्षिकांक बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी 'मन उडू उडू झालं' फेम अभिनेता विनम्र भाबल, रुपाली सोनवणे, केतन साळुंखे, लक्ष्मण हाके, विधिज्ञ प्रकाशन अॅड. जयश्री बोडेकर-झोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

(छाया : सलीम शेख)



## आरोग्य प्रहर

# शरीरात पोटॅशियमच्या कमतरतेमुळे होतात 'हे'आजार

शरीरासाठी पोटॅशियम हे एक अतिशय महत्त्वाचे खनिज मानले जाते. ते मज्ञातंतूचे कार्य योग्य पध्दतीने करण्यासाठी महत्वपूर्ण असते. शिवाय यातून स्नायूंचे आकुंचन आणि शरीरातील द्रवपदार्थाचे संतुलन नियंत्रित करण्यास मदत होते. हृदयाचे ठोके पडण्यास पोटॅशियमचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे. अनेक वेळा आहारात पोटॅशियमचे प्रमाण पुरेसे नसल्यामुळे शरीरात पोटॅशियमची कमतरता निर्माण होते किंवा एखाद्या व्यक्तीला खूप दिवसांपासून जुलाब किंवा उलट्यांचा त्रास होत असेल तर त्यामुळेही शरीराचे नुकसान होते. शरीरात पोटॅशियमच्या कमतरतेमुळे पुढील अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो.

**१. रात्री झोप न लागणे-** एका संशोधनानुसार जर शरीरात पोटॅशियमची कमतरता असेल तर त्यामुळे व्यक्ती चिंताग्रस्त होउ शकतो. त्यामुळे साहजिक त्याच्या झोपेवर परिणाम होतो आणि रात्री झोप लागत नसल्याच्या तक्रारी येत असतात. झोप न येण्याच्या समस्येला निद्रानाश म्हटले जाते.

**२. उच्च रक्तदाब-** जर शरीरात पोटॅशियमची पातळी कमी असेल तर उच्च रक्तदाब वाढू शकतो, विशेषत: जे लोक मीठाचा जास्त वापर करतात, अशांना ही समस्या निर्माण होत असते. पोटॅशियम रक्तवाहिन्यांना आराम देते, ज्यामुळे रक्तदाब कमी होण्यास मदत होते. पोटॅशियम शरीरातील सोडियमची पातळी राखण्याचे काम करते.

**३. हृदयाचे ठोके-** जर हृदयाचे ठोके कमी जास्त होत असतील, तर हे हायपोक्लेमिया किंवा पोटॅशियमच्या कमतरतेचे लक्षण देखील असू शकते. पोटॅशियम हृदयाच्या स्नायूंच्या आकुंचनाचे नियमन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे शरीरात पोटॅशियमची पातळी कमी झाल्यास हृदयाची लय बिघडू शकते. आणि 'वेंट्रिक्युलर फायब्रिलेशन'सारखे जीवघेणे आजार होऊ शकतात.

**४. जास्त थकवा-** पोटॅशियम हे शरीराच्या सर्व पेशी आणि टीशूज म्हणजेच ऊतींमध्ये आढळणारे सर्वात महत्वाचे पोषक तत्व आहे. जेव्हा पोटॅशियमची पातळी कमी होते तेव्हा त्याचा शरीराच्या अनेक कार्यांवर वाईट परिणाम होतो, ज्यामुळे व्यक्तीची उर्जादेखील कमी होते आणि व्यक्ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप थकल्यासारखा दिसतो.

**५. बद्धकोष्ठता-** पोटॅशियमच्या कमतरतेमुळे आतड्यात असलेल्या स्नायूंवरही त्याचा परिणाम होतो, त्यामुळे शरीरातून अन्न आणि टाकाऊ पदार्थ बाहेर पडण्याची प्रक्रियाही मंदावते. पचनाची ही प्रक्रिया आतड्यात मंदावल्यास बद्धकोष्ठता आणि सूज येणे यासारख्या समस्या समस्या निर्माण होतात.

**पोटॅशियमसाठी या गोष्टी खा** - बटाटा, डाळिंब, एवोकाडो, रताळे, पालक, व्हाईट बीन्स, नारळ पाणी, बीट, सोयाबीन, टोमॅटो.

# जिल्ह्यात मुलांच्या लसीकरण मोहीमेस प्रारंभ



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १२ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या लसीकरण मोहीमेस बुधवारी (दि. १६) अलिबाग नगर परिषद शाळेमध्ये प्रारंभ झाला. रायगड जिल्ह्यात १२ ते १४ वयोगटातील एक लाख ४० हजार ५०० मुले असून, या सर्वांना कोरोना प्रतिबंधक लसीचे डोस देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर यांच्या उपस्थितीत अलिबाग नगर परिषद शाळेमध्ये ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली. या वेळी नगर परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना



कोर्बेवॅक्स या कोरोना प्रतिबंधक लसीचे डोस देण्यात आले.

कोरोनाची तिसरी लाट ओसरली असली तरी पुढील काळात कोरोनाच्या चौथ्या लाटेची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत १२ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना डोस देण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार बुधवारपासून रायगड जिल्ह्यात १२ ते १४ वयोगटातील लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली.

अलिबाग नगर परिषदेच्या सर्व सहा शाळांमधील स्वाती भुसाळे, संतोष आंबेतकर, प्रमिला म्हात्रे, सबिहा चिवीचकर, रफीका हळदेणकर, अनघा पाटील, ज्योती घरत यांच्यासह कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

> **रायगड जिल्ह्यात १२ ते १४ वयोगटातील एक लाख ४० हजार ५०० मुले असून, या सर्वांना कोरोना प्रतिबंधक लसीचे डोस देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. विशेषत: ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व शाळा यांच्या समन्वयाने शाळांमध्ये लसीकरण मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. १२ ते १४ वयोगटातील सर्व मुलांनी लसीचा डोस घ्यावा.**
> **–डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड**

## दहावीच्या विद्यार्थिनीवर उपचारास उशीर

### ■ जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात तणाव

**पाली : प्रतिनिधी**

दहावीच्या परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थिनीला अचानक बरे वाटत नसल्याने तिला जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र तेथे डॉक्टर व इतर कर्मचारी उपस्थित नसल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता.

सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा येथील आत्मोन्नती विद्यामंदिर या परीक्षा केंद्रावर शैक्षणिक साहित्य वाटप करतेवेळी दहावीची एक विद्यार्थिनी रडत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्या विद्यार्थिनीला विचारणा केली असता, पोटात खूप दुखत असल्याचे तिने सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक युवराज सूर्यवंशी तसेच मिलिंद शिंदे, दीपक पवार, हरिचंद्र पाटील, नितीन परब व उपस्थितांनी तात्काळ या विद्यार्थिनीला जांभूळपाडा



प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र येथे डॉक्टर, आरोग्य सेविका किंवा आरोग्यसेवक उपलब्ध नसल्याचे दिसून आले. उपस्थित कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता डॉक्टर आल्या नसल्याचे सांगण्यात आले. येथील कर्मचाऱ्यानेच विद्यार्थिनीला औषध दिले. त्यानंतर ही विद्यार्थीनी परीक्षा केंद्रावर गेली. यावेळी दीपक पवार यांनी डॉक्टर व कर्मचारी उपस्थित नसल्याची तक्रार सुधागड तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना केली. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी परीक्षा केंद्रावर गेले व त्यांनी त्या मुलीची आरोग्य तपासणी केली.

> **जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत नागरिकांच्या तक्रारीची शहानिशा केली जाईल. त्यात तथ्य आढळल्यास संबंधित आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.**
> **–डॉ. शशीकांत मढवी, तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड**

## मुरूड नगर परिषदेची प्रभाग रचना रद्द

### ■ सार्वत्रिक निवडणूक लांबणीवर

**मुरूड : प्रतिनिधी**

नगर परिषदेची प्रारुप प्रभाग रचना रद्द झाल्याने मुरूडमधील इच्छुक उमेदवाराचा हिरमोड झाला आहे.

ओबीसी आरक्षण रद्द झाल्यामुळे निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी राज्य सरकारने राज्य निवडणूक आयोगाकडे असलेले प्रभाग रचना आणि निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्याचे अधिकार स्वतः कडे घेतले आहेत. त्यासाठी कायद्यात सुधारणा करणारे विधेयक विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आले आहेत. या विधयेकातील तरतुदीने जुनी प्रभाग रचना रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकार नव्याने प्रभागरचना निश्चित करण्यासाठी प्रक्रिया राबविणार आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या नगर परिषद निवडणुका



काही महिने लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार मुरूड नगर परिषदेची प्रभाग रचना मंजूर होऊन ती प्रसिद्धसुद्धा करण्यात आली होती. त्यामुळे निवडणूक आयोग लवकरच निवडणूक घेईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. परंतु आता प्रभाग रचना रद्द करण्यात आल्याने आता नगर परिषद निवडणूक कधी होणार असा प्रश्न राजकीय नेत्यांना पडला आहे.

## रशिया–युक्रेन युध्दामुळे खतांच्या तुटवड्याची शक्यता

### ■ खत खरेदी करण्याचे कृषि विभागाचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युध्दामुळे भारतात रासायनिक खातांच्या तुटवड्याची शक्यता आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी मार्च महिन्या अखेरपर्यंत खत खरेदी करून ठेवावीत, असे आवाहन कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे.

युध्द सुरू राहिल्यास खतांची निर्यात थांबविण्यात येईल, असे रशियाने जाहीर केले आहे. त्याचे आंतराष्ट्रीय परिणाम होतील. भारतातदेखील रासायनिक खतांचा तुटवडा भासू शकतो. खरीप हंगामात खतांचा तुटवडा येऊ शकतो.

रायगड जिल्ह्यात प्रमुख्याने खरीप हंगामात भाताचे पिक घेतले जाते. एक लाख ४० हजार क्षेत्रावर भाताची लागवड केली जाते. त्यासाठी खतांची गरज असते. रायगड जिल्ह्यात सध्या युरिया ४५५.५१ मेट्रिक टन, डीएपी २९.२५, एमओपी ३७.२८, एनपीकेएस ३६०, एसएसपी ३५६.९५, कम्पोस्ट १५.१० टन अशी एकूण १२५४ मेट्रिक टन रासायनिक खते खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

> **युध्दामुळे खतांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यत आहे. ऐनवेळी खत खरेदीसाठी गेल्यास बाजारात खते उपलब्ध नसतील. त्यामुळे शेतकऱ्यांनी मार्च महिन्यातच खत खरेदी करावीत.**
> **–डी. एस. काळभोर, कृषि उपसंचालक, रायगड**

## इजिटेक कंपनीच्या निलंबीत कामगारांचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरुच

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील विळे भागाड येथील पॉस्को कंपनीच्या अंतर्गत असणाऱ्या इजिटेक या कंत्राटी कंपनीने १७ कामगारांना कोणतेही कारण न देता तडकाफडकी निलंबित केले आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाविरोधात या कामगारांनी सोमवारपासून कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे. ते बुधवारी तिसऱ्या दिवशीही सुरू आहे.

दरम्यान, मंगळवारी (दि. १५) रात्री परेश सदानंद जंगम (रा. महाड) या उपोषणकर्त्या कामगाराची प्रकृती खालावली. त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर सुनील शिंदे या कामगारालाही बुधवारी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र इजिटेक कंपनीने या आंदोलनाची दखल घेतलेली नाही. शासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी या उपोषणाकडे पाठ फिरवली आहे.




(छाया : सलीम शेख)

## बनावट बँक खाते उघडून नऊ लाखांची फसवणूक

### खोपोली पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

बनावट बँक खाते उघडून मालकाचे नऊ लाख २० हजार ७३८ रुपये हडप करणाऱ्या दोघांविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खालापूर तालुक्यातील आत्करगाव आणि शिळफाटा येथे राहणाऱ्या दोन आरोपींनी आपसात संगनमत करुन कंपनीचे वेन्डर रघुनाथ महादु शिंदे यांची कंपनी आर. के. ॲग्रो अँण्ड पॅकिंग इंडीया या कंपनीच्या नावाचेच दुसरे बँक खाते रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या खोपोली शाखेत उघडले. त्यानंतर या कंपनीला ५ ऑक्टोंबर २०२१ ते २ फेब्रुवारी२०२२ या कालावधीत देण्यात आलेले एकूण नऊ लाख २० हजार ७३८ रुपयांचे धनादेश रघुनाथ महादु शिंदे यांच्या मुळ कंपनीच्या खऱ्या बँक खात्यामध्ये जमा न करता आरोपीनी ते धनादेश स्वत: उघडलेल्या बनावट बँक खात्यामध्ये भरणा केले. त्यानंतर त्या खात्यातील रक्कम परस्पर काढून घेतली. या फसवणुकीचा सुगावा लागताच रघुनाथ महादु शिंदे यांनी पोलिसात धाव घेतली.

या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४२०,४०८,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक हरेश काळसेकर करीत आहेत.

## पेण शहरामध्ये जाणीव जागृती फेरी

**पेण : प्रतिनिधी**

व्यसनांमध्ये पडू नका, तंबाखू गुटखा खाऊ नका, आपले शहर स्वच्छ ठेवा ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे आवाहन पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी येथे केले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत पेण शहरांमध्ये 'कुठेही थुंकू नका' जाणीव जागृती फेरी काढण्यात आली होती. या जनजागृती फेरीत पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ मार्गदर्शन करीत होते. जीवनाला हो म्हणा अमली पदार्थांना नाही म्हणा असा संदेश त्यांनी या वेळी दिला.

या जनजागृती फेरीत 'तंबाखू सोडा कर्करोग टाळा', 'सोडा तंबाखू,सिगारेट, बिडी, दारू, गुटखा, नाही तर मृत्यू घालेल तुम्हाला विळखा' या घोषणा देण्यात आल्या.

पेण पोलीस ठाण्याच्या गोपनीय शाखेचे पवार साहेब, प्रा. उदय मानकवळे, मनोरमा मानकवळे यांच्यासह पेण नगर परिषद व पोलीस ठाण्याचे कर्मचारी, प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी या जनजागृती फेरीत सहभागी झाले होते.



(छाया : अनिस मनियार)


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट 'अ' मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित **१) श्री. जोमा महादेव पाटील व इतर ५ रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड.** यांच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील असून आमचे पक्षकार यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–बेलोंडाखार, तालुका – उरण, जिल्हा रायगड**

| गावाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बेलोंडाखार | ६६ | ४ | ०–२९–१० पो.ख. ०–०१–५० | ४.६२ |
| | ६७ | २ | ०–१३–६० पो.ख. ०–०१–३० | २.०६ |
| | | एकूण | ०–४५–५० | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४** दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरीतचे काम करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. महेश ग. भगत**
बी.ए.एल.एल.बी
**पत्ता : गुरूकृपा, प्लॉट नं. ६४ बी, नवीन पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड**
**फोन : ८६५२०३४७०३**



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ११० सन २०२१-२०२२

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत (पावसाळा धरून) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंबेत बागमांडला रस्ता रा.मा.–१०० कि.मी. १८/८०० मध्ये पांगळोली पुलाचे पुर्नबांधकाम करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग)** | १३३३७५६३ | १३०५४०७२ | १३४००० | ११२०/– | ०६ महिने | वर्ग चार व वरील |
| २. | बिरवाडी वाळण सांदोशी रस्ता रा.मा.–१०२ कि.मी. १९/३०० येथे पुलाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(पूरहानी दुरुस्ती)** | २४७०५२४२ | २४३६४४२९ | १५०००० | २२४०/– | ०५ महिने | इतर |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१६/०३/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **३१/०३/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | **निविदापूर्व बैठक** | मा. अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२२/०३/२०२२** वेळ **१५.००** वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०५/०४/२०२२** वेळ १२.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१२३८**
**दिनांक : १४/०३/२०२२**

# आयसीसीकडून नव्या कसोटी क्रमवारीची घोषणा

## विराट-जडेजाला धक्का, बुमराहचा सिक्स!

**दुबई : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या टेस्ट सीरिजनंतर आयसीसीने नव्या टेस्ट क्रमवारीची घोषणा केली आहे. या क्रमवारीत जसप्रीत बुमराहला ६ स्थानांचा फायदा झाला आहे, ज्यामुळे तो सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे. तर विराट कोहलीला चार स्थानांचे नुकसान झाले आहे. विराट आता बॅटरच्या क्रमवारीत नवव्या क्रमांकावर आहे. गेल्या काही काळापासून विराट संघर्ष करत आहे. नोव्हेंबर २०१९ नंतर विराटला शतक करता आले नाही तसेच श्रीलंकेविरुद्धच्या सीरिजमध्ये पहिल्यांदाच विराटची टेस्ट सरासरी ५० पेक्षा खाली आली.

मोहाली टेस्टमध्ये १७५ रनची ऐतिहासिक खेळी करणाऱ्या रवींद्र जडेजालाही धक्का लागला आहे. ऑलराऊंडरच्या यादीत जडेजा पहिल्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर गेला आहे. बँगलोर टेस्टच्या दुसऱ्या इनिंगमध्ये शतक करणारा श्रीलंकेचा कर्णधार दिमुथ करुणारत्ने याचाही आयसीसी क्रमवारीत फायदा झाला आहे.

बुमराहने बॉलरच्या क्रमवारीत शाहीन आफ्रिदी, काईल जेमिसन, टीम साऊदी, नील वॅगनर, जॉश हेजलवूड आणि जेम्स अंडरसन यांना पिछाडीवर टाकलं. बँगलोर टेस्टमध्ये बुमराहने ८ विकेट घेतल्या. घरच्या मैदानात बुमराहला पहिल्यांदाच पाच विकेट मिळाल्या. या कामगिरीचा बुमराहच्या क्रमवारीमध्येही फायदा झाला. तर दुसरीकडे मोहम्मद शमी एक स्थान वरती १७व्या क्रमांकावर आला आहे.

श्रीलंकेचा लसिथ एम्बुलडिनिया आणि जयविक्रमा यांना पाच स्थानांचा फायदा झाला आहे. एम्बुलडिनिया ३२व्या आणि जयविक्रमा ४५ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. बॉलरच्या यादीत ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स पहिल्या, आर.अश्विन दुसऱ्या आणि कागिसो रबाडा तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

श्रीलंकेचा कर्णधार दिमुथ करुणरत्ने करियरमधल्या सर्वोत्तम तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. बाबर आझम आठव्या आणि विराट नवव्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाचा मार्नस लाबुशेन पहिल्या क्रमांकावर कायम आहे. जो रूट दुसऱ्या, स्टीव्ह स्मिथ तिसऱ्या आणि केन विलियमसन चौथ्या क्रमांकावर आहे.

वेस्ट इंडिजचा बूनर आणि भारताच्या श्रेयस अय्यर यांनी क्रमवारीत मोठी उडी घेतली आहे. बूनरला २२ आणि श्रेयस अय्यरला ४० स्थानांचा फायदा झाला. आता बूनर २२व्या आणि अय्यर ३७व्या क्रमांकावर गेले आहेत. इंग्लंडविरुद्ध बूनरने १२३ आणि नाबाद ३८ रनची खेळी केली. तर अय्यरने दुसऱ्या टेस्टमध्ये ९२ आणि ६७ रन केले. इंग्लंडच्या झॅक क्राऊलीने १२१ रन केले होते, ज्यामुळे त्याला १३ स्थानांचा फायदा झाला. तो आता ४९ व्या क्रमांकावर आला आहे.

वेस्ट इंडिजचा स्टार ऑलराऊंडर पुन्हा एकदा ऑलराऊंडरच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आला आहे. त्याने रवींद्र जडेजाला पिछाडीवर टाकलं आहे. ऑलराऊंडरच्या यादीत जडेजा दुसऱ्या, अश्विन तिसऱ्या, शाकिब चौथ्या आणि स्टोक्स पाचव्या क्रमांकावर आहेत.

दरम्यान, आयसीसीने बुधवारी जाहीर केलेल्या या क्रमवारीत रोहितने ऐतिहासिक कामगिरी केली. यासह त्याने विराट कोहलीवर कुरघोडी केली.

# टीमच्या वागणूकीबाबत विराटचा गौप्यस्फोट

**मुंबई : प्रतिनिधी**



विराट कोहली आयपीएलच्या यंदाच्या मोसमात रॉयल चॅलेंजर्स बँगलोरकडून फक्त बॅटर म्हणून खेळताना दिसेल. क्रिकेटमधून निवृत्त होईपर्यंत आपण आरसीबीकडूनच खेळू, असे विराटने आधीच स्पष्ट केले आहे. आरसीबीच्या टीमसाठी विराटच्या मनात खास जागा आहे, पण एकवेळ अशीही होती जेव्हा त्याला टीमकडून चांगली वागणूक मिळाली नव्हती. याचाच किस्सा विराटने सांगितला आहे.

एका पॉडकास्टमध्ये विराटने आरसीबीसोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. २००८ साली विराट भारताच्या अंडर-१९ टीमचा खेळाडू होता, त्याच्या नेतृत्वात भारतीय टीमने वर्ल्ड कप जिंकला होता. अंडर-१९ खेळाडू म्हणून आरसीबीमध्ये निवड झाल्यानंतर मला तुटलेल्या ओमनी व्हॅनने विमानतळावर पाठवण्यात आले, पण इतर खेळाडूंना विमानतळावर जाण्यासाठी चांगली कार देण्यात आली, असे विराटने सांगितले.

व्हॅनचे मॉडेलच जुने नव्हते तर तिची परिस्थितीही खराब होती, असेही विराट म्हणाला. आयपीएलच्या आपल्या पहिल्या मोसमात चांगली कामगिरी न करता आल्यामुळे विराट निराशही होता.

## युजवेंद्र चहलवरील ट्विटने खळबळ

**मुंबई :** यंदा आयपीएलमध्ये १० टीम खेळत असल्याने स्पर्धा आणखी वाढलीय. आयपीएल स्पर्धेचे काऊंटडाऊन सुरू झालेले असतानाच राजस्थान रॉयल्सच्या ट्विटरने खळबळ उडाली आहे.

राजस्थान रॉयल्सनं त्यांच्या ऑफिशियल ट्विटर अकाऊंटवरून 'टीमचा नवा कॅप्टन युजवेंद्र चहलला भेटा' असे ट्विट केले. त्यामुळे क्रिकेट विश्वात चर्चा सुरू झाली. संजू सॅमसन हा राजस्थानचा सध्या कॅप्टन आहे. टीम इंडियाचा हेड कोच राहुल द्रविड राजस्थान रॉयल्समध्ये होता त्यावेळी संजूची या टीममध्ये एन्ट्री झाली होती. संजू हा द्रविडचा लाडका शिष्य मानला जातो.

# झूलन गोस्वामीने घडवला इतिहास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



न्यूझीलंडमध्ये सध्या आयसीसी महिला वर्ल्डकप सुरू आहे. या स्पर्धेत बुधवारी भारत आणि इंग्लंड यांच्यातील साखळी फेरीतील लढत झाली. या लढतीत भारताची अनुभवी जलद गोलंदाज झूलन गोस्वामीने वर्ल्ड रेकॉर्ड केला. झूलनने अशी कामगिरी केली आहे जी महिला क्रिकेटमध्ये आजवर कोणाला करता आली नाही.

इंग्लंडविरुद्धच्या लढतीत झूलनने तिची पहिली विकेट घेताच एक नवा इतिहास लिहला गेला. महिला वनडे क्रिकेटच्या इतिहासात आजवर कोणत्याही गोलंदाजाला २५० विकेट घेता आल्या नव्हत्या. ही कामगिरी आता झूलनच्या नावावर झाली आहे. इतक नाही तर झूलनची ही ३५०वी विकेट ठरली आहे. झूलनची ही १९९ मॅच आहे आणि वनडे क्रिकेटच्या इतिहासात ती सर्वाधिक विकेट घेणारी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

**आयसीसी महिला वर्ल्डकप**


**झूलन गोस्वामी :** भारत - २५० विकेट
**कॅथरीन लॉरेन :** ऑस्ट्रेलिया - १८०
**अनीसा मोहम्मद :** वेस्ट इंडिज -१८०
**शबनॅम इस्माइल :** द.आफ्रिका - १६८
**कॅथरीन ब्रंट :** इंग्लंड - १६४

# सुरेश रैनाचे आयपीएलमध्ये पुनरागमन

## चेन्नई सुपर किंग्सचा माजी उप कर्णधार दिसणार नव्या अवतारात!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सुरेश रैनाच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. आयपीएल मेगा ऑक्शनमध्ये सुरेश रैनावर एकाही संघाने बोली लावली नाही. अखेरच्या क्षणाला चेन्नई सुपर किंग्स त्याला पुन्हा संघात घेतील अशी आशा होती, परंतु तसे झाले नाही. Mr. IPL सुरेश रैनाला डावलल्याने चाहते निराश झाले होते आणि त्यांनी उद्ध ला ट्रोलही केले. यंदाच्या आयपीएल २०२२ मध्ये तरी रैना खेळताना दिसणार नाही हे स्पष्ट झाले. पण, सुरेश रैना आयपीएल २०२२मध्ये परतला आहे आणि एका नव्या अवतारात तो दिसणार आहे.



रैनाला २०२१च्या आयपीएलमध्ये साजेशी कामगिरीही करता आली नाही. रैनाने १२ सामन्यांत १६० धावाच केल्या होत्या. एकूण आयपीएलमध्ये २०५ सामन्यांत ३२.५१च्या सरासरीने ५५२८ धावा केल्या आहेत. त्यात १ शतक व ३९ अर्धशतकांचा समावेश आहे. शिवाय त्याने २५ विकेट्सही घेतल्या आहेत. रैनाने ५०६ चौकार व २०३ षटकार खेचले आहेत आणि १०८ झेलही टिपले आहेत.

चेन्नई सुपर किंग्सचा माजी उप कर्णधार आयपीएल २०२२त समालोचकाच्या भूमिकेत पदार्पण करणार आहे. यावेळी तो भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्यासोबत क्रिकेट सामन्यांचे हिंदीत समालोचन करणार आहे. एका वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार सुरेश रैना Commentory Box मध्ये दिसणार आहेत. IPL 2022 Auction मध्ये अनसोल्ड राहिल्यानंतर सुरेश रैनाचे नाव गुजरात टायटन्स संघासोबत जोडले जात होते. पण, त्यांनी हे वृत्त फेटाळून लावले.

इंग्लंडचे माजी कर्णधार नासिर हुसैन सध्या न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या महिला वर्ल्ड कप स्पर्धेत समालोचन करत असल्याने ते आयपीएलमध्ये कॉमेंट्री करताना दिसणार नाही. पण, केव्हीन पीटरसन, मार्क निकोलस, इयान बिशॉप, डॅनी मॉरिसन, सिमोन डॉल, मिचेल स्लॅटर हे समालोचन करताना दिसतील.

हिंदी समालोचक - आकाश चोप्रा, इरफान पठाण, गौतम गंभीर, पार्थिव पटेल, निखिल चोप्रा, तान्या पुरोहित, किरण मोरे, जतिन सप्रू, सुरेश सुंदरम, रवी शास्त्री व सुरेश रैना

मराठी समालोचक - कुणाल दाते, प्रसन्न संत, चैतन्य संत, स्नेहल प्रधान, संदीप पाटील

# एसीसीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गांगुली, जय शहा जाणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया कप २०२२च्या आयोजनाबाबत घडामोडींना वेग आला आहे. या स्पर्धेचे कधी आणि कुठे आयोजन करावे यासाठी या आठवड्यात आशिया क्रिकेट काउंसील अर्थात एसीसीची वार्षिक सर्वसाधारण सभा होणार आहे. या बैठकीसाठी भारतीय क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष सौरव गांगुली आणि सचिव जय शहा भाग घेणार आहेत. कोरोनामुळे गेल्या वर्षी ही बैठक स्थगित करण्यात आली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार १९ मार्च रोजी श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे आशिया क्रिकेट काउंसिलची बैठक होणार आहे. या काउंसिलचे सदस्यदेखील बैठकीस उपस्थित असतील. बैठकीत आशिया कपच्या आयोजनासह अन्य अनेक गोष्टींवर चर्चा होईल. बैठकीत आशिया खंडातील सर्व देश आणि -उउ सदस्य बोर्डातील प्रतिनिधी भाग घेतील. आशिया कप २०२२ साठी श्रीलंकेला यजमानपद मिळू शकते. अर्थात अधिकृत याचे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडे आहे. पण ऑक्टोबर २०२१मध्ये काउंसिलने जाहीर केल्यानुसार यजमानपद श्रीलंकेला देण्यात आले आहे. याचे कारण भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तमावाचे संबंध होय. भारताने कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तान सोबत क्रिकेट खेळण्यास नकार दिलाय.

आशिया क्रिकेट काउंसीलची स्थापना १९८३ मध्ये झाली होती. आशिया खंडातील देशांतील ही स्पर्धा आहे. ही स्पर्धा दर दोन वर्षांनी वनडे अथवा टी-२० स्वरुपात खेळवली जाते. भारताने आतापर्यंत सर्वाधिक ७ वेळा या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. त्यानंतर श्रीलंकेचा क्रमांक लागतो, त्यांनी ५ वेळा जेतेपद मिळवले आहे.

# बॅटला लागून चेंडू स्टंपला चिकटला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाचा आतापर्यंत वन डे विश्वचषकातील प्रवास दमदार सुरू होता. न्यूझीलंडच्या संघाकडून भारताला पराभूत व्हावे लागले होते. त्यानंतर आजही इंग्लंडने भारतीय संघाला पराभवाचा धक्का दिला. या सामन्यात एक अतिशय विचित्र गोष्ट घडली.



**व्हिडिओ व्हायरल**

अनुभवी गोलंदाज झूलन गोस्वामी ही बॉलिंग करत होती. पाचव्या षटकात तिने चेंडू टाकला. फलंदाजाने चेंडू खेळताना बचावात्मक फटका खेळला. चेंडू रोखणं फलंदाजाला तितकं शक्य झालं नाही. त्यामुळे चेंडू बॅटला लागून थेट स्टंपच्या दिशेने गेला, पण चेंडू जाऊन स्टंपला चिकटला. पण स्टंपवरील बेल्स खाली पडली नाही. त्यामुळे नशिब बलवत्तर असल्याने फलंदाज नाबादच राहिला. हा व्हिडीओ सोशल मीडियावरही व्हायरल झाला आहे.

# इज्जत गेल्यानंतर पाकिस्तानवर हात जोडण्याची वेळ आली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा संघ २४ वर्षानंतर पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेला आहे. पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटीत ४५९ धावा करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात ९ बाद ५५६ धावांचा डोंगर उभा केला. या प्रकारानंतर पाकिस्तानच्या खेळपट्टीवरून आणखी टीका सुरू झाली.

पहिल्या कसोटीत दोन्ही संघांनी एक हजारहून अधिक धावसंख्या उभी केली होती. त्यावरून पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर जोरदार टीका झाली होती. कसोटीत पराभव होऊ नये म्हणून पाक बोर्डाने फलंदाजीला अनुकूल अशी खेळपट्टी तयार केल्याचा आरोप झाला. आता दुसऱ्या कसोटीतदेखील पाटा खेळपट्टी तयार केल्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंकडून टीका सहन करावी लागत आहे. या घटनेनंतर पाकिस्तान बोर्डाने मेलबर्न क्रिकेट स्टेडियम आणि आयसीसी अकादमीच माजी क्युरेटर टॉबी ल्यूम्सडन यांना बोलवले आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष रमीज राजा यांनी टॉबी यांना विनंती केली आहे की त्यांनी पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यासाठी खेळपट्टी तयार करावी. दोन्ही संघातील तिसरी कसोटी लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर २१ ते २५ मार्च दरम्यान होणार आहे. हा सामना सुरू होण्यास अद्याप ११ दिवसांचा वेळ आहे आणि टॉबी लवकरच पाकिस्तानमध्ये पोहचतील.








पनवेल : तालुक्यातील कोन येथे कै. सारिका ११ चषक २०२२ मर्यादित क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. या सामन्यांचे उद्घाटन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी भाजप महिला मोर्चा सरचिटणीस शिल्पा रवींद्र म्हात्रे, कोन ग्रामपंचायत सरपंच दीपक म्हात्रे, सदस्य जितेश शिसवे, माजी सदस्य संतोष गातारे, युवा मोर्चाचे राहुल घरत, भाजप कार्यकर्ते संदेश म्हात्रे आदी उपस्थित होते.


भावपूर्ण श्रद्धांजली



कै. दत्तात्रेय वामन पाटील
मृत्यू : दिनांक ७/०३/२०२२

कष्टातून संसार फुलविला, उरली नाही साथ
आम्हाला, आठवण येते क्षणा क्षणाला,
आजही तुमची वाट पाहतो,
यावे पुन्हा जन्माला.

शो का कू ल
पाटील परिवार, बामणडोंगरी



~ भावपूर्ण श्रद्धांजली ~

नाही कुणाच्या ध्यानी मनी अचानक गेले निघुनी,
सहवास तो सुखाचा,
आठवणीने येते डोळ्यांत पाणी...!



कै. रविंद्र बाळाराम पाटील
यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि.१४/०३/२०२२ रोजी,
देवाज्ञा झाली.ईश्वर सत्तेपुढे कोणाचेही चालत नाही,यांच्या आत्म्यास चिर शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना...
शोकाकुल : पाटील परिवार.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com